ePaper

**कृषी विभागात नवीन आका...लिंकींग खते, बियाणे....सुरेश धस यांचा खळबळजनक आरोप**



वर्ष - 8 । अंक - 252 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | बुधवार, दि. 2 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- पंजाबने उडवला लखनौचा धुव्वा
- साथ देणाऱ्या माणसाची ही किंमत करता?
- न्यायालयाने यूपी सरकारला फटकारलं
- अनंत अंबानींची जामनगरपासून पदयात्रा

### विधेयक आज सादर होणार ; भाजपाचा खासदारांना 'व्हीप'

# 'वक्फ' वरुन घमासान!

### कोणत्याही परिस्थितीत कायदा होणारच ! काँग्रेसचाही 'व्हीप' ; विरोधकांची बोलावली बैठक

### देशभर मुस्लिमांची निदर्शने ; मुस्लिम बहुल भागात सुरक्षा तैनात

। नवी दिल्ली / मुंबई । महाईन्यूज

**संसदेमध्ये आज (बुधवार दि. २ एप्रिल) वक्फ सुधारणा विधेयक सादर केले जाणार आहे. या विधेयकाला सर्व मुस्लिम संघटना आणि काँग्रेस प्रणित 'इंडी' आघाडी तीव्र विरोध करणार आहे आणि देशभर घामासान होऊन आंदोलने होणार आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीप्रणित एनडीए तसेच काँग्रेस प्रणित 'इंडी' आघाडींनी आपापल्या खासदारांना 'व्हीप' जारी केला असून संसदेमध्ये उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.**




#### भाजपाला खात्री, मुस्लिमांच्या धमक्या!

कोणत्याही परिस्थितीत हा कायदा होणारच, असे भारतीय जनता पार्टीचे म्हणणे आहे, तर कायदा झाल्यास देशातील सर्व मुस्लिम समाज दंगे घडवून आणेल, अशी धमकी काँग्रेस प्रणित आघाडीने दिली आहे.

#### संसदीय समितीच्या शिफारसी

मूळ सादर करण्यात आलेल्या वक्फ विधेयकासंदर्भात अभ्यास करण्यासाठी तसेच त्यात सुधारणा सुचवण्यासाठी संयुक्त संसदीय समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीला पुरेशी मुदत दिल्यानंतर तिने आपला अहवाल आणि सुधारित मसुदा सादर केला असून त्यावर आता संसदेच्या दोन्ही सभागृहात चर्चा होऊन विधेयकाचे रूपांतर कायद्यामध्ये होण्याची शक्यता आहे.

#### सुळे,सावंत यांचा विरोध

या विधेयकाला काँग्रेसच्या मित्र पक्षांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. त्यामध्ये शरद पवार गट, उद्धव ठाकरे गट यांचाही समावेश आहे. पवार गटाच्या सुप्रिया सुळे आणि ठाकरे गटाचे अरविंद सावंत यांनी गेल्या वेळी या विधेयकाच्या मुद्द्यावरून सरकारला धारेवर धरले होते. त्यांनी मुस्लिमांची बाजू उचलून धरली होती.

#### आता नितीशकुमार, चंद्राबाबू महत्त्वाचे !

संसदीय कामकाज मंत्री किरण रिजीजू यांनी म्हटले आहे, की हे विधेयक नक्कीच संमत होणार आहे. भारतीय जनता पार्टीचे सर्व मित्र पक्ष मोदी सरकारच्या पाठीशी ठाम आहेत. मित्र पक्षांमधील नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू यांचे खासदारही या विधेयकाला भक्कम पाठिंबा देणार आहेत. याशिवाय ऐनवेळी विरोधी आघाडीतील काही मते देखील आमच्या पारड्यात पडण्याची शक्यता असल्याने वक्फ बोर्डाचा कायदा निश्चितपणे संमत होईल, अशी खात्री त्यांनी व्यक्त केली.

#### संजय राऊत यांच्या मनातील खदखद..

राज्यसभेचे खासदार आणि उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी या विधेयकाबाबत काही शंका उपस्थित केल्या आहेत. भारतीय जनता पार्टीकडे स्वबळाचे बहुमत नाही. त्यांचे २४० खासदार आहेत. नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू यांच्या टेकूवर नरेंद्र मोदी सरकार उभे आहे. या विधेयकाच्या निमित्ताने या दोघांनी ठरविले, तर सरकार पाडू शकतात आणि तसेच घडण्याची दाट शक्यता असल्याचे राऊत म्हणाले.

#### मुस्लिमांची दिशाभूल : शहानवाज हुसेन

या विधेयकावर सर्व बाजूंची सुमारे आठ तास चर्चा होण्याची शक्यता आहे. भाजपाचे प्रवक्ते शहानवाज हुसेन यांनी म्हटले आहे, की या विधेयकाबाबत देशातील मुस्लिमांना चुकीची माहिती देऊन दिशाहीन केले जात आहे. त्यांची दिशाभूल केली जात असून हे विधेयक त्यांच्या भल्यासाठी आहे, हे सांगण्याची वेळ आलेली आहे. पूर्वी 'यु ए ए' विधेयकाच्या वेळी पण अशीच दिशाभूल केली गेली आहे, असेही ते म्हणाले.

#### कोर्टात जाऊ : काँग्रेसचा इशारा

हे विधेयक मंजूर करून घेण्यासाठी सत्ताधारी पक्षाकडून जबरदस्ती झाली किंवा काही चुकीच्या हालचाली झाल्या, तर आम्ही कोर्टात जाऊन न्याय मागू, असा इशारा काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी दिला आहे.

#### या, काय आहे वक्फ बोर्ड ?

वक्फ बोर्ड हा वक्फ अधिनियम १९५४ अंतर्गत स्थापन करण्यात आला. मुस्लिम समाजाला धार्मिक कार्यासाठी जमिनी वापरण्यासंबंधी हा कायदा होता. यानंतर वक्फ अधिनियम १९९५ लागू करण्यात आला. याशिवाय प्रत्येक राज्यातही वक्फ बोर्ड स्थापन केले गेले. आता परिस्थिती अशी आहे, की देशातील सर्व माफीयांनी या वक्फ बोर्डाचा ताबा घेतला आहे. केंद्रीय वक्फ परिषदेच्या मार्फत या बोर्डाची देखरेख केली जाईल असे सांगितले जात होते. ही सर्व व्यवस्था कायदेशीर वाटत असली तरी यातील सर्व सदस्य फक्त मुस्लिम असतात, त्यामुळे त्यांच्याच हिताचे निर्णय घेतले जातात.

#### पाहिजे त्या जमिनीवर बोर्डाचा ताबा !

१९९५ मधील कायद्याच्या कलम ४० नुसार कोणत्याही जमिनीवर वक्फ बोर्डने दावा दाखल केल्यास ती जमीन त्यांचीच होते. नव्या कायद्यात या सर्व तरतुदी रद्द करण्यात येणार आहेत.

#### ओवैसी यांची धमकी..

दरम्यान, फक्त उत्तर प्रदेशातील सव्वा लाख पैकी १.१५ लाख जमिनींची आपल्याकडे कागदपत्रे नाहीत. जर हे विधेयक मंजूर झाले, तर आपल्या या जमिनी हातून जातील, अशी धमकी देऊन ,'एमआयएम' चे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी सर्व विरोधी पक्षांना हे विधेयक हाणून पाडण्याचे आवाहन केले आहे. अशीच अवस्था इतर राज्यांचीही आहे असे ते म्हणाले.

#### फडणवीस यांचे उद्धव यांना आवाहन आणि आव्हान !

'वक्फ' विधेयकाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक ट्विट केले असून उद्धव ठाकरे यांना उद्देशून काही मजकूर आहे. ते उद्धव ठाकरे यांना आवाहन आहे का आव्हान, याची चर्चा मात्र सुरू होती. आपल्या ट्विटमध्ये फडणवीस म्हणतात.."वक्फ सुधारणा विधेयक उद्या संसदेत !.. बघू या, उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना, हिंदुहृदयसम्राट, वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विचार राखणार की राहुल गांधी यांच्या पावलावर पाऊल ठेवून तुष्टीकरण करीत राहणार ?" हे आवाहन आहे का आव्हान याची मात्र राजकीय विश्लेषकांमध्ये चर्चा सुरू होती.

# महापालिकेला भरघोस उत्पन्न!

## पुणे पालिकेला मिळकत करातून 2 हजार 350 कोटी रुपयांचे उत्पन्न

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगरपालिकेला आर्थिक वर्षातील (२०२४-२५) मिळकत करातून दोन हजार ३५० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा सुमारे १०० कोटी रुपयांनी वाढ झाली असली, तरी उद्दिष्टपूर्ती साध्य करता आलेली नाही. मिळकतकराच्या वसुलीसाठी महापालिकेला मार्च महिन्यापर्यंत प्रयत्न करावे लागले असून, अखेरच्या दहा दिवसांत १७० कोटी रुपये मिळाले आहेत.**



मिळकतकर हा महापालिकेच्या उत्पन्नापैकी मुख्य स्त्रोत आहे. गेल्या आर्थिक वर्षात म्हणजे एक एप्रिल २०२३ ते २५ मार्च २०२४ या कालावधीत दोन हजार १३६ कोटी ८ लाख २४ हजार ६३४ कोटींचे उत्पन्न कर आकारणी आणि करसंकलन विभागाला मिळाले होते, तर चालू आर्थिक वर्षासाठी दोन हजार ७७० कोटी रुपये उत्पन्नाचे उद्दिष्ट देण्यात आले होते. परंतु, या आर्थिक वर्षात राज्य शासनाने समाविष्ट गावातील थकबाकीला स्थगिती दिली. तसेच, उरुळी देवाची आणि फुरसुंगी ही दोन गावे महापालिकेतून वगळल्याने मिळकतकरावर परिणाम झाला. तसेच, ४० टक्के कर सवलत, भोगवटा पत्र मिळाल्यानंतर त्या मिळकतींच्या करआकारणीला विलंब, त्यानंतर दुरुस्ती आदी कारणांमुळे उद्दिष्टपूर्ती साध्य करण्यास महापालिकेला अपयश आले आहे.महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधून महापालिकेला ४१४.०९ कोटी रुपयांचा निधी मिळाला. फुरसुंगी आणि ऊरूळी देवाची या दोन गावांमधील मिळकतधारकांनी ३५.२२ कोटी रुपये जमा केले. या दोन्ही गावांसह समाविष्ट ३४ गावांमधून ४४९.३२ कोटी रुपयांचे उत्पन्न महापालिकेला मिळाले. दरम्यान, मिळकतकराच्या उद्दीष्टपूर्तीसाठी थकबाकी वसुलीला महापालिकेने प्राधान्य दिले होते. त्यासाठी स्वतंत्र वसुली पथकांची स्थापना करण्यात आली, महापालिकेने थकबाकी वसुलीसाठी बँड पथक, महिला कर्मचाऱ्यांचे पथक, मिळकत जप्तीसारख्या नियमित उपाययोजना केल्या. मिळकतकराची वसुली सुरू करण्यात आली.मिळकतकर थकबाकीदारांसाठी महापालिका कोणतीही अभय योजना राबविणार नसल्याने मिळकतकर तातडीने जमा करावा, असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी केले. मात्र, मिळकतकर विभागाला उद्दिष्टपूर्ती साध्य करता आली नाही, हे स्पष्ट झाले आहे. मागील वर्षी मिळकतकर विभागाला दोन हजार २४९ कोटी रुपये उत्पन्न मिळाले होते, अशी माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.मिळकतकर हा महापालिकेच्या उत्पन्नापैकी मुख्य स्त्रोत आहे. गेल्या आर्थिक वर्षात म्हणजे एक एप्रिल २०२३ ते २५ मार्च २०२४ या कालावधीत दोन हजार १३६ कोटी ८ लाख २४ हजार ६३४ कोटींचे उत्पन्न कर आकारणी आणि करसंकलन विभागाला मिळाले होते, तर चालू आर्थिक वर्षासाठी दोन हजार ७७० कोटी रुपये उत्पन्नाचे उद्दिष्ट देण्यात आले होते. परंतु, या आर्थिक वर्षात राज्य शासनाने समाविष्ट गावातील थकबाकीला स्थगिती दिली. तसेच, उरुळी देवाची आणि फुरसुंगी ही दोन गावे महापालिकेतून वगळल्याने मिळकतकरावर परिणाम झाला. तसेच, ४० टक्के कर सवलत, भोगवटा पत्र मिळाल्यानंतर त्या मिळकतींच्या करआकारणीला विलंब, त्यानंतर दुरुस्ती आदी कारणांमुळे उद्दिष्टपूर्ती साध्य करण्यास महापालिकेला अपयश आले आहे

### स्वतंत्र वसुली पथकांची स्थापना

फुरसुंगी आणि ऊरूळी देवाची या दोन गावांमधील मिळकतधारकांनी ३५.२२ कोटी रुपये जमा केले. या दोन्ही गावांसह समाविष्ट ३४ गावांमधून ४४९.३२ कोटी रुपयांचे उत्पन्न महापालिकेला मिळाले. दरम्यान, मिळकतकराच्या उद्दीष्टपूर्तीसाठी थकबाकी वसुलीला महापालिकेने प्राधान्य दिले होते. त्यासाठी स्वतंत्र वसुली पथकांची स्थापना करण्यात आली.

# वेताळ टेकडी फोडल्यास शहरातील भूजल धोक्यात?

## पुणेकर नागरिकांमध्ये जागरूकता व संवेदनशीलता यावी : खाडे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वेताळ टेकडी फोडून पौड रस्ता-बालभारती रस्त्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या नियोजित भुयारी मार्गामुळे बशीच्या तळाशी येणारे पाणी तिथेच साचून राहील. या मार्गासाठी करण्यात येणाऱ्या स्फोटांमुळे जमिनीतल्या आतल्या भेगांचे प्रवाह नष्ट होतील. त्यामुळे जमिनीत मुरणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी होणार असून, शहरातील भूजल धोक्यात येईल,' असे मत जलव्यवस्थापन तज्ज्ञ सतीश खाडे यांनी शनिवारी व्यक्त केले.**



दिशा-२०२५ आणि अंतर्नाद कला साधना यांच्यातर्फे न्यू इंग्लिश स्कूलच्या गणेश सभागृहात आयोजित 'पाण्यासाठी एक साद...' या संगीत मैफिलीचे निवेदन खाडे करत होते. त्या वेळी पाण्याचे महत्त्व, जल व्यवस्थापन आणि जलप्रदूषण या विषयावर खाडे यांनी भाष्य केले. कलाकार नीता उपासनी, गौरी बापट, अनुजा गाडे, प्रिया अय्यर, अनघा पाठक यांनी पाऊस, तळी, नदी, सागर अशा पाण्याच्या विविध रूपांवरील गाणी मैफिलीत सादर केली. डॉ. विद्याधर बापट, उदय गुजर, विजय सबनीस आदी या वेळी उपस्थित होते.स्वच्छ पाणी पुणेकर वापरतात. पुणेकरांनी वापरलेले सुमारे ८० कोटी लिटर सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता मुळा-मुठेच्या पात्रात सोडले जाते. हेच पाणी पुढे नदीच्या प्रवाहाबरोबर गावागावांत जाते. या प्रदूषित पाण्यावर पिके काढली जातात, जनावरांसाठीही तेच पाणी वापरले जाते. या रानातला भाजीपाला, धान्य आणि जनावरांचे मांस शहरातच विक्रीसाठी आणले जाते. त्यामुळे गावासह शहरातही रोगराई वाढते. मुळा-मुठा नदीचे प्रदूषण हे धोक्याच्या पातळीपेक्षा साठपट अधिक आहे,' असे खाडे यांनी या वेळी नमूद केले.या गीतमैफिलीत पाणी व पाऊस यावर 'जलाशयाच्या लक्ष दर्पणी', 'पाण्यातले पहाता प्रतिबिंब हासणारे', 'तोहरे ताल मिले नदी के जलमें', 'कशी काळ नागिणी, सखे गं वैरीण झाली नदी', 'इक लडकी भीगी भागीसी', 'नभ उतरू आलं' इत्यादी लोकप्रिय गीते सादर झाली.

### पाणी तिथेच साचून राहील

पाण्याच्या सुयोग्य वापरासंबंधीच्या प्रतिज्ञेतून शपथ दिली. पाण्यासंबंधी पुणेकर नागरिकांमध्ये जागरुकता व संवेदनशीलता यावी यासाठी पुण्याच्या विविध भागात कार्यक्रम आयोजित करण्यासाठी त्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन केले.वेताळ टेकडी फोडून पौड रस्ता-बालभारती रस्त्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या नियोजित भुयारी मार्गामुळे बशीच्या तळाशी येणारे पाणी तिथेच साचून राहील.

## पिंपरी-चिंचवडमधील रहिवाशी क्षेत्रात

# चार दारु दुकानांची ‘बाटली आडवी’!

### आमदार महेश लांडगे यांच्या लक्षवेधीनंतर प्रशासनाचा ‘ॲक्शन मोड’

### नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुकानांचा परवाना कायमस्वरुपी रद्द

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील रहिवाशी क्षेत्रात किंवा सोसायटी परिसरात दारुच्या दुकांनामुळे होणाऱ्या त्रासाविरोधात आमदार महेश लांडगे यांनी नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये आवाज उठवला होता. दारु दुकांनदारांच्या मनमानीबाबत नियमांची कठोर अंमलबजावणी व्हावी आणि नियमबाह्य काम करणाऱ्या दारु दुकानदारांवर कारवाई करावी, अशी मागणी केली होती. त्यामुळे हा मुद्दा महाराष्ट्रभरात चर्चेत आला. त्याला सर्वपक्षीय आमदारांसह उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही सकारात्मक उत्तर दिले होते. अखेर त्याचा ‘रिझल्ट’ दिसू लागला आहे.**





राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दारु दुकानांच्या नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, असे निर्देश सभागृहात दिले. त्यानंतर आमदार महेश लांडगे यांनी संबंधित विषयाला अनुसरुन भोसरीसह पिंपरी-चिंचवड शहरातील नियमबाह्यपणे दारु विक्री व्यावसाय करीत आहेत. ज्यांच्यामुळे रहिवाशी क्षेत्रात नाहक उपद्रव होत आहे. अशा दुकानदारांबाबत चिखली-मोशी-चऱ्होली- पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन आणि आमदार लांडगे यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे तक्रार दाखल आहेत. त्यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली होती.

दरम्यान, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी नियमबाह्यपणे दारु विक्री आणि नियमांचे उल्लंघटन केल्याबाबत भोसरी विधानसभा मतदार संघातील चिखली व मोशी या भागात श्रीमती उषा चौधरी देशी दारु दुकान, मे. एम. डी. के. बिअर शॉपी, मे. गोल्डन बिअर शॉपी आणि लकी बिअर शॉपी यांच्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी यांना पाठवला होता. त्यावर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सदर दुकानांचा परवाना कायमस्वरुपी रद्द करण्याची कारवाई केली आहे.



#### दारु विक्रेत्यांमध्ये खळबळ...

रहिवाशी क्षेत्रातील दारु दुकानदारांच्या मनमानीमुळे सामान्य नागरिकांना होणारा त्रास याबाबत आमदार महेश लांडगे यांनी विधानसभा सभागृहात आवाज उठवला. त्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक उत्तर दिले. तसेच, सर्वपक्षीय आमदारांनीही या मुद्याला पाठिंबा दिला. त्यानंतर तात्काळ जिल्हा प्रशासनाने भोसरी मतदार संघात तपासणी केली. नियमबाह्य व्यावसाय करणाऱ्या चार दुकानांचा परवाना कायमस्वरुपी रद्द झाला. परिणामी, चुकीचे काम केल्यास कारवाई अटळ आहे, असा संदेश दारु विक्रेते दुकानदारांमध्ये गेला आहे. त्यामुळे मद्य विक्री व्यावसायिकांच्या वर्तुळात खळबळ उडाली आहे.

> रहिवाशी आणि सोसायटींच्या आवारात असलेल्या दारु विक्री दुकानांच्या नियमबाह्य कृतींमुळे सामान्य नागरिकांना त्रास होतो आहे. याबाबत सोसायटीधारकांच्या मागणीनुसार प्रशासनाकडे तक्रार केली होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष होत होते. त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. त्यावेळी सरकारने कार्यवाहीचे आश्वासन दिले होते. त्यानंतर आम्ही पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालय आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे कारवाईसाठी पाठपुरावा केला. यावर आम्ही केलेल्या तक्रारींमधील 4 दुकानांचा परवाना कायमस्वरुपी रद्द करण्याची कारवाईची कारवाई करण्यात आली. ज्याप्रमाणे पिंपरी-चिंचवडमध्ये कारवाई केली, तसेच नागरी वस्ती उपद्रव होईल, अशी दुकाने बंद करण्याबाबत महाराष्ट्रभरात प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी राज्य सरकारकडे आहे.
>
> **–महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## मराठवाडा जनविकास संघाचा वर्धापन दिन साजरा

### पिंपरी-चिंचवड शहरातील मराठवाड्यातील नागरिकांसाठी रुग्णवाहिका सुरू करण्यात येणार

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।


**मराठवाडा जनविकास संघाच्या १३ व्या वर्धापन दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यानिमित्त पिंपरी-चिंचवड शहरातील मराठवाड्यातील नागरिकांसाठी रुग्णवाहिका सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अध्यक्ष अरुण पवार यांनी एक लाख रुपयांचा धनादेश कार्यकारिणीकडे सुपूर्द केला.**



दीप प्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी मराठवाडा जनविकास संघाचे अध्यक्ष अरुण पवार, उपाध्यक्ष अविनाश थिटे, सचिव सुर्यकांत कुरुलकर, सहसचिव वामन भरगंडे, सदस्य दत्तात्रय धोंगडे, आशिष पवार, बळिराम माळी, अभिमन्यू गाडेकर, अनिस पठाण, अजय सोनवणे, नामदेव पवार, शशिकांत दुधारे, सखाराम वालकोळी, नागेश जाधव, गौरीशंकर किन्नीकर, राजेश गाटे, शिवाजी सुतार, तसेच बाळासाहेब साळुंखे, किशोर आटरगेकर, सुनिल अंभोरे, सखाराम वाचकुळ, शंकर तांबे, बाळासाहेब काकडे, छावा संघटनेचे धनाजी येळकर, बालाजी पांचाळ, अनिता पांचाळ, राहुल शिंपले, विष्णु रसाळ, चिखली विभागाचे अध्यक्ष गोविंद तांबवाडे, उपाध्यक्ष निवृत्ती भोसले, सचिव सुग्रीव पाटील, खजिनदार रंगनाथ आवारे, सह. खजिनदार लक्ष्मण जाधव, सल्लागार गोरख पाटील निलंगेकर, दशरथ शिंदे, मल्लिकार्जुन शेट्टे, महादेव हडपद, सदस्य बिभिषण पवार, ज्ञानोबा साखरे, चतुर्भुज चव्हाण, संतोष लातुरे, सचिन जगदणे, संघटक बाबासाहेब चौधरी आदि मान्यवर उपस्थित होते.

वर्धापन दिनानिमित्त मराठवाडा जनविकास संघाची मुख्य कार्यकारिणी व घरकुल विभाग चिखलीची यांच्या संकल्पनेतून विविध उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. घरकुल विभाग चिखली या ठिकाणी संस्थेची नूतन कार्यकारिणी नेमण्यात आली. या कार्यकारिणी फलकाचे पूजन व नियुक्तीपत्र माजी सत्तारूढ पक्षनेते एकनाथ पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या नूतन कार्यकारिणीने रुग्णवाहिका सेवेसाठी सव्वालाख रुपयांचा धनादेश दिला.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संगतीचे जीवनात अतिशय महत्त्व आहे

आयुष्यात संगतीला फार महत्त्व असते. संगतीचा परिणाम विनासायास आणि बराचसा न कळत होत असतो. संतसंगती लाभणे ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. ती पूर्वपुण्याईमुळेच लाभते. ज्याच्याशी आपण संगत करावी, त्याचे गुणधर्म आपल्याला येऊन चिकटतात हे आपण पाहतो. समजा, काही लोकांनी इथे यायचे ठरविले. एकाने विचार केला की आपण पायीच जाऊ, दुसरा बैलगाडीने निघाला, तिसऱ्याने आगगाडीने प्रवास केला, तर चौथा मोटारने आला. सर्वजण जर एकाच ठिकाणाहून निघाले तर साहजिकच मोटारीने येणारा सर्वांत लवकर पोहोचेल; म्हणजे ज्याच्याशी संगत केली त्या वाहनाचे गुणधर्म त्याला विनासायास लाभले. संगतीची दुसरी गंमत अशी की, ज्याच्या संगतीत आपण जातो त्याच्यापुढे आपले कर्तृत्व लोप पावते. इथून पुष्कळ मुले शिक्षण घेऊन पुढे कुणी वकील झाले, तर कुणी डॉक्टर झाले. परत इथे आल्यावर त्यांनी इथल्या मुलींशी लग्ने केली. त्या मुली फारशा शिकलेल्या नसतील; परंतु वकिलाशी लग्न केलेली वकिलीणबाई झाली, डॉक्टरशी लग्न केलेली डॉक्टरीण झाली. असे जर देहाच्या संगतीने सामान्य माणसाचेही गुणधर्म आपल्यात येतात, तर सत्संगतीचा परिणाम किती होत असला पाहिजे ! आपण तिकीट काढून गाडीत बसतो. आपल्या शेजारी कोण येऊन बसेल ते आपल्या हाती नसते. तो विडी ओढणारा असला आणि आपल्याला धूर सहन होत नसला तरी नाइलाजाने तिथेच बसावे लागते. व्यसनी किंवा विषयी माणसाची संगत ही अशी तापदायक, घातक असते. उलट सत्पुरुषाची संगत ही उत्तम, लाभदायी ठरते. सत्संगतीपासून सद्वासना आणि सद्विचार प्राप्त होतात.

एखादा साधू बैरागी असेल, झाडाखाली बसला असेल. तो स्वत: उपाशी असेल तर त्याच्याकडे येणारी मंडळीही उपाशी राहतील. समर्थांकडे कुणी गेला तर ते म्हणतील, "मी भिक्षेची झोळी घेतो, तूही घे; दोघेही भिक्षा मागून आणू, आणि जे मिळेल ते शिजवून खाऊ." पण संत गृहस्थाश्रमी असेल तर आपल्याकडे येणाराला तो वाटेल ते करून खायला घालील. अन्नानुसार वासना बनते, म्हणून संताघरचे अन्न मागून घेऊन खावे. संताची देहाने संगती लाभणे सुलभ नाही. तो राहात असेल तिथून आपण लांब राहात असू; आणि जवळ राहात असलो तरी प्रपंच-कामधंद्यामुळे चोवीस तासांत त्याच्या सान्निध्यात कितीसे राहता येणार ? मग देहसंगतीचा लाभ कितीसा मिळेल ? तेव्हा नामाची संगत हीच सर्वांना सदासर्वकाळ लाभण्यासारखी उत्तम सत्संगत होय

**बोधवचन:- परमार्थ साधण्यास सत्संगती फारच उपयोगी पडते.**

# काड्या घालण्याचं हत्यार उपसलं, राऊतांनी नको तिथं नाक खुपसलं!



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**शिल्लक सेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी प्रत्येक राजकीय गोष्टींमध्ये नाक खुपसण्याचा जणू विडाच उचलला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची धोरणे असोत, मणिपूरमधील अशांतता असो, पाकमधील कंगाल स्थिती असो, 'आयपीएल' चे लिलाव असोत, नाहीतर महाराष्ट्र केसरी कुस्तीतील वादग्रस्त निकाल असो.. प्रत्येक गोष्टीमध्ये विश्वप्रवक्ते संजय राऊत हे बोलणार म्हणजे बोलणारच !**





### भाजपाची अंतर्गत बाब, यांचा संबंध काय?

पंतप्रधान पदावरून नरेंद्र मोदी यांनी कधी पायउतार व्हायचे ? त्यांचा वारसदार कोण असू शकेल ? याबाबत वक्तव्य करण्याशी संजय राऊत यांचा कसलाही दुरान्वयानेही संबंध नाही. पण, स्वतःचा पक्ष बुडवला..आता उद्योग राहिला नाही, त्यामुळे इतरांच्या हालचालींवर लक्ष ठेवून जमल्या तर काड्या टाकण्याचा धंदा संजय राऊत यांचा सुरू असतो. कोणी त्यांना पोपट म्हणो, कोणी चोंबडेपणा म्हणो, नाहीतर कोणी नाक खुपसणे म्हणो, त्यांची अविरत बडबड सुरूच असते, हे लक्षात घ्या ! मोदींचा वारसदार कोण? हे भाजपवाले पाहतील ना..प्रसंगी, संघाची मदतही घेतील..पण, आगीत पेट्रोल टाकण्याची आणि जमले तर काडी पेटवण्याची अफलातून किमया संजय राऊत यांनी साधली आहे आणि कोणी कितीही बोलले तरी त्याची त्यांना मुळीच खंत नसते!

### आपले ठेवा झाकून, इतरांचे पाहा वाकून !

स्वतःचा पक्ष पेटला आहे, पक्ष संपून त्याचा एक गट बनला आहे, रोज आमदार, नगरसेवक सोडून चालले आहेत.. त्या ठिकाणी ठिगळं लावायchi सोडून ऊठसूठ भाजपावर तोंडसुख घ्यायचे आणि त्यांच्या प्रवक्त्यांच्या शिव्या खायच्या, एवढाच पुरुषार्थ संजय राऊत यांच्याकडे उरला आहे. आपल्या पक्षातले ठेवायचे झाकून आणि भाजपाचे पाहायचे वाकून ही त्यांची जीवनशैली बनली आहे.

### उचलली जीभ, लावली टाळ्याला..

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा वारसदार कोण ? मोदींचा वारसदार नेमका कोणत्या राज्यातून असेल ? मोदींचा वारसदार कोण ठरवणार? हे प्रश्न सध्या संजय राऊत यांना भेडसावत आहेत. महत्त्वाची गोष्ट अशी, की या प्रश्नांची उत्तरेही राऊतांकडे आहेत. नरेंद्र मोदींचा नागपूर दौरा आणि त्यातही संघ मुख्यालयाची भेट, सरसंघचालक मोहन भागवत यांच्याशी चर्चा, त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोबत असणे आणि संघाच्या कार्याचे मोदींनी केलेले कौतुक..या सगळ्या घटनाक्रमाचा संजय राऊतांनी त्यांना हवा तसाच अर्थ काढला आहे आणि 'उचलली जीभ लावली टाळ्याला' ही त्यांची परंपरा त्यांनी जपली आहे.

### फडणवीसांकडे अंगुलीनिर्देश !

नरेंद्र मोदींचा वारस महाराष्ट्रातून असेल असे संजय राऊत यांनी सांगून टाकले आहे. त्यामुळे राऊतांचा रोख मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे होता का, अशी कुजबूज राजकीय वर्तुळात सुरू झाली. संघाची चर्चा बंद दाराआड असते. ती बाहेर येत नसते. तरीही काही संकेत असतात, ते स्पष्ट आहेत. संघ ठरवेल पुढील पंतप्रधान..तो बहुतेक महाराष्ट्रातील असेल, असे संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. अर्थात्, सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.

### फडणवीसांकडून चर्चेला विराम..

या संदर्भात ज्यावेळी फडणवीस यांना विचारले गेले, तेव्हा त्यांनी संपूर्ण चर्चेला पूर्णविराम दिला. २०२९ साली नरेंद्र मोदीच पुन्हा पंतप्रधान होतील. वडील हयात असताना वारसदार म्हणून मुलाची चर्चा करणे, ही मुघली परंपरा आहे, ही आपली परंपरा नाही, अशा सौम्य शब्दांत फडणवीसांनी संजय राऊत यांना अक्षरशः कोलले आणि चर्चेला पूर्णविराम दिला !

### राऊत यांना 'महायुती' ने फटकारले..

एक गोष्ट लक्षात घ्या,फक्त फडणवीसांनीच नाही, तर भाजपा आणि शिवसेनेच्या इतर नेत्यांनीही संजय राऊतांच्या भविष्यवाणीवर चांगलेच तोंडसुख घेतले. बावनकुळे, दरेकर आणि शिरसाट यांनी तर ठाकरेंना मिळालेल्या वारशाचीही आठवण करुन दिली. मोदींच्या वारसदाराबाबत संजय राऊतांनी केलेल्या दाव्यावरुन महायुतीच्या नेत्यांनी निशाणा साधला. राऊतांनी स्वतःच्या पक्षाकडे पाहावे, असा टोला प्रवीण दरेकर, शंभूराज देसाई आणि चित्रा वाघ यांनी लगावला.

### विरोधी आघाडीवर 'ठंडा ठंडा, कूल कूल'

भाजपाच्या विरोधकांकडून राऊत यांच्या या बाष्कळ बोलण्यावर फारशा प्रतिक्रिया आल्या नाहीत. नाही म्हणायला, माजी खासदार राजू शेट्टी यांनी नवे भाकीत करुन टाकले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडूनही नेहमीप्रमाणेच अतिशय सावध प्रतिक्रिया आली आहे. थोडक्यात काय, संजय राऊत यांचे हे वक्तव्य अदखलपात्र ठरले !

### वारसदाराची गडबड नाही, पण..

मोदींचा वारसदार म्हणून अमित शाह, योगी आदित्यनाथ यांची नावे सतत चर्चेत असतात. त्या यादीत संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीस यांचे नाव सामील केले आहे. आता, असली ही फालतू बडबड करुन संजय राऊत यांनी फडणवीसांचे काम सोपे केले की अडचण वाढवली, हे कळायला काही काळ जावा लागेल !

### फडणवीस परिपक्व नेते..

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेतृत्व आणि भाजपामधील पहिल्या फळीतील सुमारे २५ नेते हे विचारांनी भक्कम आणि पूर्णपणे परिपक्व आहेत. त्यांचा या असल्या भाकितांवर मुळीच विश्वास नाही, किंबहुना, त्याची ते दखलही घेणार नाहीत. पण, नेहमी चर्चेत राहण्यासाठी वाटेल ते मुद्दे फेकणाऱ्या संजय राऊत यांचे तोंड कोण धरणार ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाराष्ट्रात ई-बाईक टॅक्सीला परवानगी!

## सर्वसामान्य प्रवाशांची गैरसोय दूर होणार : प्रताप सरनाईक

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्रात ई-बाईक टॅक्सीला परवानगी देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. परिवहन विभागाकडून हा प्रस्ताव आज मंत्रिमंडळ बैठकीत मांडण्यात आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत महाराष्ट्रात फक्त ई-बाईक टॅक्सीलाच परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांना सागितलं आहे.**



प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्रात लवकरच राबवल्या जाणाऱ्या ई-बाईक टॅक्सी उपक्रमाबाबत माहिती दिली. "परिवहन विभागाच्या माध्यमातून ई-बाईक टॅक्सीचा प्रस्ताव मंत्रिमडळाच्या मान्यतेसाठी ठेवला होता. सर्व मंत्र्यांनी महाराष्ट्रात बाईक टॅक्सीला परवानगी दिली आहे. आत्तापर्यंत एकट्या प्रवाशांची गैरसोय होत होती. रिक्षा-टॅक्सीसाठी एका प्रवाशालाही तिप्पट भाडं द्यावं लागत होतं. आता ई-बाईक टॅक्सीच्या माध्यमातून सर्वसामान्य प्रवाशांची ही गैरसोय दूर होणार आहे", असं प्रताप सरनाईक म्हणाले."पूर्ण महाराष्ट्रात ई-बाईक टॅक्सीला परवानगी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. त्यासाठी १५ किमी अंतराची मर्यादा ठेवण्यात आली आहे. ५० बाईक एकत्रपणे घेणाऱ्या संस्थेला अशा प्रवासी वाहतुकीची परवानगी दिली जाईल. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आम्ही चांगली नियमावली बनवली आहे.

दोन प्रवाशांमधील पार्टिशन, पावसाळ्यात प्रवासी भिजू नये यासाठी पूर्ण कव्हर असणाऱ्याच ई-बाईकला आम्ही परवानगी देणार आहोत. ई बाईकला प्रोत्साहन देण्यासाठी हे धोरण राज्य सरकारने ठरवलं आहे", असंही सरनाईक यांनी नमूद केलं.दरम्यान, या ई-बाईक टॅक्सीसाठी प्रवासी भाड्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाणार असल्याचं सरनाईक म्हणाले. "यातल्या प्रवासी भाड्याच्या बाबतीत लवकरच निर्णय घेतला जाईल. त्याबाबतच्या निर्णयासंदर्भात आम्ही अंतिम टप्प्यापर्यंत आलो आहोत. आज धोरणाला मंजुरी मिळाली आहे. कमीत कमी दरांमध्ये प्रवाशांना रोजगार कसा देता येईल, यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत", असं ते म्हणाले."प्रवासी भाड्यासंदर्भातली नियमावली सरकार तयार करणार आहे. रिक्षात ज्या प्रवासासाठी १०० रुपये लागतात, तो प्रवास ई-बाईक टॅक्सीमध्ये ३० ते ४० रुपयांत कसा होईल त्याबाबत आम्ही नियोजन करत आहोत. येत्या एक ते दोन महिन्यांत ई-टॅक्सी बाईक सुरू होतील", अशी माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली."रिक्षा महामंडळाच्या सदस्य चालकांना १० हजारांचं अनुदान देण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. त्यासंदर्भात चर्चा झाली आहे. रिक्षावाल्याच्या मुलाने किंवा मुलीने ई-बाईक टॅक्सी घेतली तर त्याला १० हजार रुपयांचं अनुदान सरकार देईल, उर्वरीत रक्कम त्यांनी कर्ज रुपाने घ्यावी. जेणेकरून त्या मुलाच्या किंवा मुलीच्या खिशात एक रुपयाही नसताना त्याला ई-बाईक टॅक्सी घेता येईल", असंही ते म्हणाले."फक्त मुंबई महानगर क्षेत्रात १० हजारांहून जास्त रोजगार निर्माण होईल. महाराष्ट्रभरात २० हजार रोजगार निर्माण होईल", असा दावा सरनाईक यांनी केला. ताप सरनाईक यांनी महाराष्ट्रात लवकरच राबवल्या जाणाऱ्या ई-बाईक टॅक्सी उपक्रमाबाबत माहिती दिली.

### 50 बाईक घेणाऱ्या संस्थेला परवानगी

"परिवहन विभागाच्या माध्यमातून ई-बाईक टॅक्सीचा प्रस्ताव मंत्रिमडळाच्या मान्यतेसाठी ठेवला होता. सर्व मंत्र्यांनी महाराष्ट्रात बाईक टॅक्सीला परवानगी दिली आहे. आत्तापर्यंत एकट्या प्रवाशांची गैरसोय होत होती. रिक्षा-टॅक्सीसाठी एका प्रवाशालाही तिप्पट भाडं द्यावं लागत होतं. आता ई-बाईक टॅक्सीच्या माध्यमातून सर्वसामान्य प्रवाशांची ही गैरसोय दूर होणार आहे", असं प्रताप सरनाईक म्हणाले."पूर्ण महाराष्ट्रात ई-बाईक टॅक्सीला परवानगी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. त्यासाठी १५ किमी अंतराची मर्यादा ठेवण्यात आली आहे. ५० बाईक एकत्रपणे घेणाऱ्या संस्थेला अशा प्रवासी वाहतुकीची परवानगी दिली जाईल.

---

# तर मंत्र्यांना राज्यात फिरू देणार नाही!

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत योग्य तो निर्णय घ्यावा : राजू शेट्टी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्रात महायुतीचं सरकार सत्तेत येऊन जवळपास चार महिने झाले आहेत. मात्र, महायुतीच्या नेत्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता अद्यापही होताना पाहायला मिळत नाही. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महायुतीच्या नेत्यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचं आश्वासन दिलं होतं. मात्र, महायुतीचं सरकार सत्तेत आल्यानंतर ही घोषणा आता हवेतच विरल्याचं पाहायला मिळत आहे.**



शेतकऱ्यांना कर्जमाफीची आशा लागलेली असतानाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी होईल की नाही? याबाबत स्पष्ट सांगितलं. शेतकऱ्यांनी आपआपले कर्ज भरण्याचे सूतोवाच अजित पवार यांनी केले. दरम्यान, यावरूनच आता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी हे आक्रमक झाले आहेत. 'महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अन्यथा मंत्रिमंडळातील मंत्र्यांना राज्यात फिरू देणार नाही', असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे. ते आज पत्रकार परिषदेत बोलत होते.महायुतीने शेतकऱ्यांचं कर्ज माफ करण्याचं आश्वान दिलं. पण आता अजित पवारांनी सांगितलं कर्जाचे पैसे भरा. या क्षणाला अनेक शेतकरी थकबाकीदार आहेत. त्या शेतकऱ्यांना बँकांनी नोटीस काढल्या आहेत. यावरून राज्यातील शेतकऱ्यांची आवस्था काय आहे हे लक्षात येतं. खरं तर लोकांनी शेतकऱ्यांचं दुहेरी नुकसान केलं आहे. राज्यातील जिल्हा मध्यवर्ती बँका देखील अडचणीत आलेल्या आहेत. आता कर्ज माफ झालं नाही म्हणून शेतकऱ्यांना एकीकडे जप्तीच्या नोटीसा येत आहेत", असं राजू शेट्टी यांनी म्हटलं आहे.दुसरीकडे वेळेत कर्ज न भरल्याप्रकरणी व्याज सवलत मिळत नाही. तसेच त्या शेतकऱ्यांचा समावेश थकबाकीदारांमध्ये होतो. तसेच शेतकऱ्यांनी ते कर्ज भरलं नाही म्हणून पुन्हा कर्ज मिळणार नाही. अशा पद्धतीची शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. मात्र, आम्ही हे सहन करणार नाहीत. येत्या एका आठवड्यात राज्य सरकारने याबाबतची भूमिका जाहीर करावी. अन्यथा महाराष्ट्र सरकारच्या मंत्रिमंडळात असणाऱ्या तीनही पक्षाच्या मंत्र्यांना आम्ही राज्यात फिरू देणार नाही", असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला.राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार २८ मार्च रोजी एका कार्यक्रमात बोलताना शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार की नाही? याबाबत मोठं भाष्य केलं होतं.

### अजित पवार काय म्हणाले होते?

महाराष्ट्रात महायुतीचं सरकार सत्तेत येऊन जवळपास चार महिने झाले आहेत. मात्र, महायुतीच्या नेत्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता अद्यापही होताना पाहायला मिळत नाही. पण पैशाचं सोंग करता येत नाही. मी महाराष्ट्रातील जनतेला स्पष्ट सांगतो. ३१ मार्चच्या आत आपआपले पीक कर्जाचे पैसे भरा", असं अजित पवार म्हणाले होते.

# सर्वोच्च न्यायालयाने यूपी सरकारला फटकारले!

## बुलडोझर कारवाई प्रकरणी नुकसान भरपाईचे आदेश

।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वातील भाजपाचं सरकार सत्तेत आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याची भूमिका घेतल्याचं अनेकदा पाहायला मिळतं. मात्र, गेल्या काही दिवसांपासून उत्तर प्रदेशातील गुन्हेगारांच्या मालमत्तेवर बुलडोझर कारवाई करण्यात येत असल्यामुळे योगी आदित्यनाथ यांचं सरकार चांगलंच चर्चेत आहे. अनेक गुन्हेगारांच्या मालमत्तेवर बुलडोझर कारवाई करण्यात आल्याचंही पाहायला मिळालं. आता एका प्रकरणातील बुलडोझर कारवाईवरून सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला चांगलंच फटकारलं आहे.**





### 10 लाखांची भरपाई निश्चित

आणि कोणत्याही नागरिकाचं निवासी घर किंवा बांधकाम अशा प्रकारे पाडलं जाऊ शकत नाही.” न्यायमूर्ती अभय एस ओक आणि उज्वल भुयान यांच्या खंडपीठाने या प्रकरणावरील सुनावणी दरम्यान टिप्पणी करताना म्हटलं की ही प्रकरणे आमच्या विवेकाला धक्का देतात. दरम्यान, याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी म्हटलं की, “राज्य सरकारने चुकीच्या पद्धतीने घरे पाडली. कारण त्यांना वाटलं की ही जमीन गुंड-राजकारणी अतिक अहमदची आहे. मात्र, तो २०२३ मध्ये पोलीस चकमकीत मारला गेला होता.आम्ही हे संपूर्ण प्रकरण बेकायदेशीर म्हणून नोंदवत आहोत. प्रत्येक प्रकरणात १० लाखांची भरपाई निश्चित केली पाहिजे.

प्रयागराजमधील एक वकील, एक प्राध्यापक आणि इतर काहींची घरे २०२१ मध्ये पाडल्याचा आरोप करत सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवरील सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी उत्तर प्रदेश सरकार आणि प्रयागराज विकास प्राधिकरणावर चांगलेच ताशेरे ओढले. तसेच ही कारवाई बेकायदेशीर आणि असंवेदनशील असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. अशा प्रत्येक प्रकरणात पुढील ६ आठवड्यात प्रत्येकी १० लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला दिले आहेत. या संदरभातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.यावेळी सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं की,“देशात कायद्याचं राज्य आहे आणि कोणत्याही नागरिकाचं निवासी घर किंवा बांधकाम अशा प्रकारे पाडलं जाऊ शकत नाही.” न्यायमूर्ती अभय एस ओक आणि उज्वल भुयान यांच्या खंडपीठाने या प्रकरणावरील सुनावणी दरम्यान टिप्पणी करताना म्हटलं की ही प्रकरणे आमच्या विवेकाला धक्का देतात. दरम्यान, याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी म्हटलं की, “राज्य सरकारने चुकीच्या पद्धतीने घरे पाडली. कारण त्यांना वाटलं की ही जमीन गुंड-राजकारणी अतिक अहमदची आहे. मात्र, तो २०२३ मध्ये पोलीस चकमकीत मारला गेला होता.आम्ही हे संपूर्ण प्रकरण बेकायदेशीर म्हणून नोंदवत आहोत. प्रत्येक प्रकरणात १० लाखांची भरपाई निश्चित केली पाहिजे. हे करण्याचा हा एकमेव मार्ग आहे. कारण या कारवाईमुळे संबंधित प्राधिकरण नेहमीच योग्य प्रक्रियेचे पालन करण्यासाठी नेहमी लक्षात ठेवेल. ही प्रकरणे आपल्या विवेकाला धक्का देतात. अपीलकर्त्यांचे निवासस्थान निर्दयीपणे पाडण्यात आले. अधिकाऱ्यांनी आणि विशेषतः विकास प्राधिकरणाने हे लक्षात ठेवलं पाहिजे की निवारा मिळण्याचा अधिकार हा भारतीय संविधानाच्या कलम २१ चा अविभाज्य भाग आहे. अशा प्रकारे बांधकाम पाडणे हे वैधानिक विकास प्राधिकरणाच्या असंवेदनशीलतेचे दर्शन घडवते.”प्रयागराजमधील एक वकील, एक प्राध्यापक आणि इतर काहींची घरे २०२१ मध्ये पाडल्याचा आरोप करत सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवरील सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी उत्तर प्रदेश सरकार आणि प्रयागराज विकास प्राधिकरणावर चांगलेच ताशेरे ओढले. तसेच ही कारवाई बेकायदेशीर आणि असंवेदनशील असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. अशा प्रत्येक प्रकरणात पुढील ६ आठवड्यात प्रत्येकी १० लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला दिले आहेत. या संदरभातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.यावेळी सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं की,“देशात कायद्याचं राज्य आहे.

# अनंत अंबानींची जामनगरपासून पदयात्रा

## दररोज रात्री 10 ते 12 किमी किलोमीटर प्रवास पायी प्रवास

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**देशातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे चेअरमन मुकेश अंबानी यांचे धाकटे पुत्र अनंत अंबानी पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. यावेळी ते त्यांच्या पदयात्रेमुळे प्रसारमाध्यमांवर झळकत आहेत. त्यांनी गुजरातमधील जामनगर येथील त्यांच्या निवासस्थानापासून द्वारकेपर्यंतची पदयात्रा सुरू केली आहे. त्यांच्या या पदयात्रेचा आजचा सहावा दिवस आहे. ते दररोज रात्री अनेक किलोमीटर पायी चालतात आणि दिवसा विश्रांती घेतात.**



### जामनगर ते द्वारका अशी पदयात्रा

अनंत अंबानी हे त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांप्रमाणे कारने किंवा खासगी हेलिकॉप्टरने नव्हे तर पायी निघाले आहेत. त्यांनी जामनगर ते द्वारका अशी पदयात्रा सुरू केली आहे. या पदयात्रेत ते प्रत्येक रात्री १० ते १२ किलोमीटर पायी चालत आहेत. दरम्यान, वाटेत येणाऱ्या मंदिरांमध्ये जाऊन दर्शन घेत आहेत.

या पदयात्रेदरम्यान, अनंत अंबानी वाटेत येणाऱ्या प्रत्येक मंदिरात जाऊन दर्शन घेत आहेत, प्रार्थना करत आहेत. या पदयात्रेच्या माध्यमातून त्यांनी देशातील तरुणांना एक खास संदेश देखील दिला आहे.अंबानी कुटुंबाची भगवान द्वारकाधीशांवर श्रद्धा आहे. या कुटुंबातील सर्वच सदस्य त्यांच्या आयुष्यात मोठी घटना घडल्यास, एखादं काम पूर्ण झाल्यास, शुभ काम करण्यापूर्वी द्वारकाधीशांच्या दर्शनाला जातात. या महिन्यात अनंत अंबानी यांचा वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त अनंत अंबानी द्वारकाधीशांच्या दर्शनासाठी निघाले आहेत. मात्र, अनंत अंबानी हे त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांप्रमाणे कारने किंवा खासगी हेलिकॉप्टरने नव्हे तर पायी निघाले आहेत. त्यांनी जामनगर ते द्वारका अशी पदयात्रा सुरू केली आहे. या पदयात्रेत ते प्रत्येक रात्री १० ते १२ किलोमीटर पायी चालत आहेत. दरम्यान, वाटेत येणाऱ्या मंदिरांमध्ये जाऊन दर्शन घेत आहेत.अनंत अंबानी यांच्या पदयात्रेचा आजचा सहावा दिवस आहे. ते आतापर्यंत ६० किलोमीटरपर्यंत चालले आहेत. आज विश्वनाथ वेद संस्कृत शाळेत त्यांचं स्वागत करण्यात आलं. १० एप्रिलला त्यांचा ३० वा वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त त्यांना द्वारकाधीशांचे आशीर्वाद घ्यायचे आहेत.या पदयात्रेच्या माध्यमातून अनंत अंबानी यांनी देशातील तरुणांना सनातन संस्कृतीप्रति आस्था बाळगण्याचा संदेश दिला आहे. अनंत अंबानी म्हणाले, “द्वारकाधीशांच्या आशीर्वादाने मला शक्ती मिळाली आहे आणि मी दररोज चालत आहे. पाच दिवसांपासून मी चालत आहे. पुढच्या पाच दिवसांत मी द्वारकाधीश मंदिरात दाखल होईन आणि भगवान द्वारकाधीशांचे दर्शन घेईन.”दिवसा पदयात्रा काढली तर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल, तसेच सध्या उन्हाळ्याचे दिवस असून दिवसा इतकं चालणं सोपं नाही. यामुळे अनंत अंबानी यांनी रात्री प्रवास करण्याचा निर्णय घेतला आहे.

# प्रेक्षकांची लाडकी जोडी नव्या मालिकेत एकत्र झळकणार

‘सुख म्हणजे नक्की काय असतं’ या मालिकेने डिसेंबर महिन्यांत प्रेक्षकांचा निरोप घेतला. या मालिकेत गिरीजा प्रभू आणि मंदार जाधव ही जोडी गौरी-जयदीपच्या भूमिकेत झळकली होती. जुनी मालिका संपल्यावर अवघ्या ३ महिन्यांतच ही जोडी ‘स्टार प्रवाह’ वाहिनीवर पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाली आहे.‘स्टार प्रवाह’च्या ‘कोण होतीस तू, काय झालीस तू’ या नव्या मालिकेतून मंदार जाधव पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या नव्याकोऱ्या मालिकेत मंदार ‘यश धर्माधिकारी’ ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. ‘सुख म्हणजे नक्की काय असतं’ मधील जयदीप-गौरीच्या जोडीला प्रेक्षकांचं



भरभरुन प्रेम मिळालं. महाराष्ट्राची ही लोकप्रिय जोडी या नव्या मालिकेतून कावेरी आणि यशच्या रुपात पुन्हा एकदा आपली जादू दाखवण्यासाठी सज्ज झाली आहे. या मालिकेत मंदारच्या म्हणजेच यशच्या आईची भूमिका अभिनेत्री सुकन्या मोने साकारणार आहेत.

कोण होतीस तू, काय झालीस तू’ मालिकेतल्या भूमिकेविषयी सांगताना मंदार म्हणाला, ‘स्टार प्रवाहबरोबर काम करणं नेहमीच आनंददायी अनुभव असतो. ‘श्री गुरुदेव दत्त’, ‘सुख म्हणजे नक्की काय असतं’नंतर आता ‘कोण होतीस तू, काय झालीस तू’ ही तिसरी मालिका ‘स्टार प्रवाह’बरोबर करतोय. आधीच्या दोन्ही भूमिकांपेक्षा वेगळी अशी ही व्यक्तिरेखा आहे. या मालिकेत मी ‘यश धर्माधिकारी’ हे पात्र साकारतोय. दिसायला अतिशय देखणा, आपल्या लूक्सबद्दल सदैव जागृक असलेल्या यशला फॅशनची उत्तम जाण आहे. अनेक मुली यशच्या प्रेमात आहेत मात्र, यशने आईला वचन दिलं आहे की, तिच्या आवडीच्या मुलीशीच तो लग्न करेल. त्याचं त्याच्या कुटुंबावर आणि खास करुन त्याच्या आईवर प्रचंड प्रेम आहे. आई जे सांगेल त्यावर डोळे झाकून विश्वास ठेवतो.

# सखी गोखले अमेय वाघबद्दल नेमकं काय म्हणाली?



सुव्रत जोशी व सखी गोखले(SAKHI GOKHALE) हे सध्या ‘वरवरचे वधू वर’ या नाटकामुळे सध्या चांगलेच चर्चेत आहेत. नुकताच त्यांना त्यांच्या या नाटकासाठी झी नाट्य गौरव पुरस्कार सोहळ्यात अनुरूप जोडीचा पुरस्कार मिळाला आहे. सखी व सुव्रत हे पहिल्यांदा २०१५ साली प्रदर्शित झालेल्या दिल दोस्ती दुनियादारी या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आले होते. या मालिकेत सखी व सुव्रतबरोबरच स्वानंदी टिकेकर, पूजा ठोंबरे, पुष्कराज चिरपूटकर आणि अमेय वाघ हे कलाकार प्रमुख भूमिकेत दिसले होते. आता सखीने अमेय वाघबाबत केलेले वक्तव्य केले आहे.सुव्रत व सखी गोखले यांनी नुकताच महाराष्ट्र टाइम्सबरोबर संवाद साधला. त्यावेळी त्यांना एक टास्क दिला होता. काही वैशिष्ट्ये सांगितल्यानंतर त्यांना काही व्यक्तींची नावे सांगायची होती. गोड म्हटलं की कोण आठवतं असं विचारल्यावर सखीने सुव्रतचं नाव घेतलं. तर सुव्रतने सखीचं नाव घेतलं. त्यानंतर सखीने स्वप्नील जोशीचे नाव घेतले. तो सगळ्यांशी खूप प्रेमाने वागतो. त्यामुळे तो खूप गोड आहे. तर सुव्रतने चिन्मयी सुमित ही खूप गोड आहे. सखीच्या ती जवळची आहे.तिने मलाही जावई म्हणून मला स्वीकारलं आहे. ती माया लावते. ती फार आनंद आणि उत्साह देणारी आहे. तिखट कोण आहे, असे विचारल्यानंतर सखी गोखले म्हणाली, “अमेय वाघ. कारण आतापर्यंतच्या आयुष्यात जेवढी भांडणं कोणाशी झाली नाही.

# लग्न करण्यासाठी नवऱ्याने गॅरेज सुरू केलं

सेलिब्रिटींच्या खासगी आयुष्याविषयी जाणून घेण्यात चाहत्यांना नेहमीच उत्सुकता असते. कलाकारांच्या कामाबद्दल, तसेच त्यांच्या प्रेमी जीवनाबद्दल जाणून घेण्यासाठी चाहते कायमच उत्सुक असतात. कलाकारांच्या आयुष्यातील अनेक जोडीदार हे बहुतांश मनोरंजन या क्षेत्रातलेच असतात. अभिनय क्षेत्रात काम करणाऱ्या पती-पत्नी कलाकारांच्या कितीतरी जोड्या आहेत. त्यापैकी एक लोकप्रिय जोडी म्हणजे ‘लक्ष्मी निवास’ (LAKSHMI NIWAS) मालिका फेम प्रसिद्ध अभिनेत्री पल्लवी वैद्य (PALLAVI VAIDYA) आणि तिचे पती केदार वैद्य (KEDAR VAIDYA). पल्लवी वैद्य ही टेलिव्हिजन क्षेत्रातली लोकप्रिय अभिनेत्री आहे; तर केदार वैद्यही याच क्षेत्रात प्रसिद्ध दिग्दर्शक आहेत. केदार वैद्य हे आज दिग्दर्शक म्हणून या क्षेत्रात कार्यरत असले तरी एकेकाळी त्यांनी पल्लवीच्या सांगण्यावरून स्वत:चं गॅरेज सुरू केलं होतं. त्याबद्दल त्यांनी स्वत: सांगितलं आहे. झी मराठीवरील ‘होम मिनिस्टर’ या कार्यक्रमात त्यांनी याबद्दलचा एक किस्सा सांगितला आहे.त्याबाबत केदार वैद्य यांनी असं सांगितलं, “मी पल्लवीला लग्नासाठी विचारलं तेव्हा पल्लवीनं मला सांगितलं की, आमच्या घरी इंडस्ट्रीमधला चालणार नाही. तर मी म्हटलं का? काय वाईट आहे? मी आता सहायक दिग्दर्शक आहे आणि पुढे जाऊन दिग्दर्शकही होईन. त्यावर ती मला स्वत:चा व्यवसाय असणारा मुलगा हवा, असं ती म्हणाली होती. कारण- तिच्या वडिलांचा व्यवसाय होता. म्हणून मग मी गॅरेज टाकलं होतं.”त्याबद्दल पुढे ते म्हणाले, “मी हे क्षेत्र सोडून स्वत:चं गॅरेज टाकलं होतं. कुणाकडून तरी कर्ज वगैरे घेऊन ते सुरू केलं होतं. मग मी पल्लवीच्या घरी जायला लागलो आणि एके दिवशी तिच्या वडिलांना भेटलो, ज्यांची पल्लवीनं मला भीती दाखवली होती. त्यांनी मला गॅरेजबद्दल वगैरे विचारलं. मी त्यांना म्हणालो की, नाही हे मी आता सुरू केलं आहे. याआधी मी फिल्म इंडस्ट्रीत होतो. त्यावर ते म्हणाले की, मग काय झालं? का सोडली?”पुढे केदार यांनी असं म्हटलं, “पल्लवीच्या वडिलांचे हे उत्तर ऐकून मी अवाकच झालो. कारण- तिनंच मला या क्षेत्रातला मुलगा चालणार नाही, असं म्हटलं होतं. पण हिचे बाबा तर आता म्हणतायत की, फिल्म इंडस्ट्री का सोडली? पण तेव्हा गॅरेजमुळे मी खूप कर्जात होतो. माझी पूर्ण वाट लागली होती. मग अखेर गॅरेज बंद झाल्यावर मला पल्लवीनं होकार दिला.”पल्लवीचे पती केदार वैद्य हे मराठी चित्रपट, मालिका दिग्दर्शक आहेत. ‘माझ्या नवऱ्याची बायको’, ‘माझे पती सौभाग्यवती’, ‘झिपऱ्या’ तुझेच मी गीत गात आहे’, ‘अंतरपाट’ यांसारख्या मालिकांचं त्यांनी दिग्दर्शन केलं आहे. ‘अगंबाई अरेच्चा!’ या चित्रपटात त्यांनी सह-दिग्दर्शक म्हणून काम केलं होतं. याच चित्रपटाच्या सेटवर त्यांची व पल्लवीची मैत्री झाली होती. ही मैत्री पुढे प्रेमात बदलली.

# ‘सुंदर मी होणार’ ३० वर्षांनी पुन्हा रंगभूमीवर

‘जुने ते सोने’ या उक्तीचा प्रत्यय सध्या मराठी रंगभूमीवर येत आहे. काही नाट्यकलाकृती कितीही जुन्या झाल्या तरी पुनःपुन्हा बघाव्याशा वाटतात. कदाचित म्हणूनच, रंगभूमीवर या जुन्या नाट्यकलाकृतींची नव्याने नांदी होऊ घातली आहे. तेव्हाची अनेक नाटकं आज इतक्या वर्षांनंतरही नाट्य रसिकांच्या आणि निर्माता-दिग्दर्शकांच्या मनावर गारुड करून आहेत. यातील काही नाटकांना पुनरुज्जीवित करण्याचे धाडस आजचे काही निर्माते करताना दिसत आहेत. ‘पुलं’च्या समर्थ लेखणीतून प्रकटलेलं ‘सुंदर मी होणार’ हे नाटक ‘पुलं’च्या स्मृतिदिनी आणि ज्येष्ठ साहित्यिका सुनीताबाई देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त देखण्या नट संचात रंगमंचावर दाखल होणार आहे. पुलंचे ‘सुंदर मी होणार’ हे नाटक तब्बल तीस वर्षांनी पुन्हा रंगभूमीवर येत आहे. ‘सवाईगंधर्व’ निर्मित ‘अभिजात’ प्रकाशित या नाटकाची दिग्दर्शकीय धुरा राजेश देशपांडे सांभाळणार आहेत.सुंदर मी होणार या नाटकाच्या निमित्ताने दोन गुणी कलाकार पहिल्यांदाच एकत्र रंगमंचावर पाहायला मिळणार आहेत. अभिनेता आस्ताद काळे आणि अभिनेत्री शृजा प्रभुदेसाई ही नवी जोडी या नाटकाच्या



निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र आली आहे. या दोघांसोबत आता या नाटकात अजून कोणते कलाकार झळकणार? याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे. करण देसाई आणि आकाश भडसावळे निर्मित करीत असलेल्या या नाटकाचा नुकताच शानदार मुहूर्त मुंबईत संपन्न झाला. यावेळी ज्येष्ठ अभिनेत्री (पद्मश्री) नयना आपटे, पुलंचे पुतणे श्री. जयंत देशपांडे आणि ज्येष्ठ अभिनेते प्रदीप वेलणकर आवर्जून उपस्थित होते. तरुण पिढीलाही पुलंची लेखणी अजून भुरळ घालीत असल्याचे समाधान व्यक्त करून या नवीन पण समर्थ संचातील नाटकास त्यांनी शुभेच्छा दिल्या.त्या त्या काळात रंगभूमीवर येऊन गेलेल्या अनेक अजरामर नाट्यकलाकृती स्मरणरंजनाच्या पुनःप्रत्ययाच्या आनंदासोबत काहीतरी विचार देऊ पाहण्याच्या उद्देशाने नव्याने रंगभूमीवर येत असतात. याच मांदियाळीतलं पु.ल.देशपांडे यांच्या लेखणीतून सजलेलं नाट्यकृतीतलं एक सुंदर पान उलगडलं जातंय याचा आनंद दिग्दर्शक राजेश देशपांडे व्यक्त करतात.पुलंचा २५ वा स्मृतीदिवस आणि सुनीताबाईंचे जन्मशताब्दी वर्ष या निमित्ताने पुलं-सुनीताबाई या जोडीने एकत्रित भूमिका केलेलं एकमेव नाटक म्हणजे ‘सुंदर मी होणार’ आणि म्हणून या वर्षी ‘सुंदर मी होणार’ या नाटकाचे प्रयोग करून या दोघा ज्येष्ठ कलावंतांना मानवंदना द्यावी.

# साथ देणाऱ्या माणसाची ही किंमत करता?

## ब्राव्हो यांची इंडिज क्रिकेट बोर्डाच्या निर्णयावर टीका

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सूर्यकुमार यादवचा षटकार, ‘खेळाडूंवर कसा अन्याय होतो हे तुम्ही कॅरेबियन क्रिकेटच्या चाहत्यांना आणि समस्त क्रिकेटविश्वाला पुन्हा एकदा दाखवून दिलं आहे. अनाकलनीय आणि अतर्क्य असा हा निर्णय आहे. वेस्ट इंडिजचा ट्रेन्टी२० संघ रसातळाला असताना रोव्हमन पॉवेलने कर्णधारपदाचा काटेरी मुकूट स्वीकारला. त्याने संघाची मोट बांधली. संघ जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानी पोहोचला. त्याच रोव्हमन पॉवेलला कर्णधारपदावरून दूर करण्यात आलं आहे.**



ज्या खेळाडूने तुम्हाला पडत्या काळात साथ दिली, त्याला अशी वागणूक देता, त्याची अशी किंमत करता’, अशा शब्दात वेस्ट इंडिजचा माजी कर्णधार ड्वेन ब्राव्होने आपला संताप व्यक्त केला आहे.वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाने टी२० कर्णधारपदावरून रोव्हमन पॉवेलची हकालपट्टी केली आहे. टी२० कर्णधार म्हणून शे होपची निवड व्हावी अशी शिफारस मुख्य प्रशिक्षक डॅरेन सॅमी यांनी केली आहे. कसोटी कर्णधार क्रेग ब्रेथवेटने राजीनामा दिला आहे. कसोटी कर्णधारासंदर्भात अद्याप निर्णय जाहीर झालेला नाही.ड्वेन ब्राव्हो २०१२ आणि २०१६ टी२० विश्वचषक विजेत्या संघाचा भाग होता. वेस्ट इंडिजचं कर्णधारपदही त्याने भूषवलं आहे. आयपीएल स्पर्धेत मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्स या संघांच्या विजयातही त्याने निर्णायक भूमिका बजावली आहे. आयपीएल स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स पटकावणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत प्रदीर्घ काळ ब्राव्होचं नाव अव्वलस्थानी होतं. अलीकडेच युझवेंद्र चहलने ब्राव्होचा विक्रम मोडला.वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्ड आणि खेळाडू यांच्यातील बेबनाव गेली अनेक वर्ष खदखदतो आहे. वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाची आर्थिक स्थिती बरी नाही. वेस्ट इंडिजच्या बहुतांश खेळाडूंनी जगभरात होणाऱ्या टी२० लीगला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे वेस्ट इंडिजचा संघ कमकुवत झाला आहे. योगायोग म्हणजे रोव्हमन पॉवेल आयपीएलमधल्या कोलकाता नाईट रायडर्स संघाचा भाग आहे. तडाखेबंद फटकेबाजी तो ओळखला जातो. रोव्हमनने ३७ टी२० सामन्यात वेस्ट इंडिजचं प्रतिनिधित्व केलं आहे. २०२३ मध्ये त्याने वेस्ट इंडिजच्या टी२० कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारली. रोव्हमनच्या नेतृत्वात वेस्ट इंडिज संघाने कामगिरीत सुधारणा करत आगेकूच केली. ब्राव्हो कोलकाता नाईट रायडर्स संघाचे मेन्टॉर म्हणून काम पाहत आहेत. रोव्हमनला टी२० कर्णधारपदावरून दूर केल्याने ब्राव्हो यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.२०२२-२३ हंगामात रोव्हमन दिल्ली कॅपिटल्स संघाचा भाग होता.

गेल्या हंगामात तो राजस्थान रॉयल्सकडून खेळला. लिलावात कोलकाता नाईट रायडर्स संघाने १.५ कोटी रुपये खर्चून त्याला संघात समाविष्ट केलं. ज्या खेळाडूने तुम्हाला पडत्या काळात साथ दिली, त्याला अशी वागणूक देता, त्याची अशी किंमत करता’, अशा शब्दात वेस्ट इंडिजचा माजी कर्णधार ड्वेन ब्राव्होने आपला संताप व्यक्त केला आहे.वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाने टी२० कर्णधारपदावरून रोव्हमन पॉवेलची हकालपट्टी केली आहे. टी२० कर्णधार म्हणून शे होपची निवड व्हावी अशी शिफारस मुख्य प्रशिक्षक डॅरेन सॅमी यांनी केली आहे. कसोटी कर्णधार क्रेग ब्रेथवेटने राजीनामा दिला आहे. कसोटी कर्णधारासंदर्भात अद्याप निर्णय जाहीर झालेला नाही.

### चहलने ब्राव्होचा विक्रम मोडला

ड्वेन ब्राव्हो २०१२ आणि २०१६ टी२० विश्वचषक विजेत्या संघाचा भाग होता. वेस्ट इंडिजचं कर्णधारपदही त्याने भूषवलं आहे. आयपीएल स्पर्धेत मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्स या संघांच्या विजयातही त्याने निर्णायक भूमिका बजावली आहे. आयपीएल स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स पटकावणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत प्रदीर्घ काळ ब्राव्होचं नाव अव्वलस्थानी होतं. अलीकडेच युझवेंद्र चहलने ब्राव्होचा विक्रम मोडला.वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्ड आणि खेळाडू यांच्यातील बेबनाव गेली अनेक वर्ष खदखदतो आहे. वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाची आर्थिक स्थिती बरी नाही. वेस्ट इंडिजच्या बहुतांश खेळाडूंनी जगभरात होणाऱ्या टी२० लीगला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे वेस्ट इंडिजचा संघ कमकुवत झाला आहे. योगायोग म्हणजे रोव्हमन पॉवेल आयपीएलमधल्या कोलकाता नाईट रायडर्स संघाचा भाग आहे. तडाखेबंद फटकेबाजी तो ओळखला जातो.

# पंजाबने उडवला लखनौचा धुव्वा!

## दिग्वेश राठीला प्रियांश आर्यच्या विकेटचं सेलिब्रेशन भोवणार का?

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**प्रभसिमरन सिंग आणि नेहल वढेरा यांच्या खणखणीत खेळींच्या बळावर पंजाबने लखनौचा अक्षरक्ष: धुव्वा उडवला. लखनौनं दिलेलं १७२ धावांचं आव्हान लखनौनं १६.१ षटकातच पार केलं आणि ८ विकेट्सनी दणदणीत विजय मिळवला.**



पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. अर्शदीप सिंगने धोकादायक मिचेल मार्शला पहिल्याच षटकात तंबूत परतावलं. एडन मारक्रम आणि निकोलस पूरन यांनी पंजाबच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. लॉकी फर्ग्युसनने मारक्रमला त्रिफळाचीत करत ही जोडी फोडली. ऋषभ पंत आत्मघातकी फटका खेळून बाद झाला. त्याने २ धावा केल्या.आयुष बदोनी आणि अब्दुल समद या युवा जोडीने लखनौला सन्मानजनक धावसंख्या गाठून दिली. आयुषने ४४ तर अब्दुलने २७ धावांची खेळी केली. पंजाबतर्फे अर्शदीप सिंगने ३ विकेट्स पटकावल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी आक्रमक सुरुवात केली. दिग्वेश राठीने प्रियांशला बाद केलं. यानंतर प्रभसिमरनने चौकार, षटकारांची लयलूट केली. ३४ चेंडूत ९ चौकार आणि ३ षटकारांसह ६९ धावांची खेळी करून प्रभसिमरन बाद झाला. प्रभसिमरन बाद झाल्यानंतर श्रेयस अय्यर आणि नेहल वढेरा यांनी तिसऱ्या विकेटसाठी ३७ चेंडूत ६७ धावांची भागीदारी करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. श्रेयसने ३० चेंडूत ३ चौकार आणि ४ षटकारांसह नाबाद ५२ धावांची खेळी केली. नेहलने २५ चेंडूत ३ चौकार आणि ४ षटकारांसह नाबाद ४३ धावांची खेळी केली.आयपीएलच्या नव्या हंगामात भारतीय खेळाडू छाप उमटवत आहेत. मंगळवारी लखनौ-पंजाब लढतीत अनोख्या केशरचनेच्या दिग्वेश राठीचं विकेट सेलिब्रेशनची सोशल मीडियावर चर्चा रंगली. हे सेलिब्रेशन त्याला महागात पडू शकतं का हे समजून घेऊया. लखनौकडून खेळणाऱ्या दिग्वेश राठीने पंजाबच्या प्रियांश आर्याला बाद केलं. दिग्वेशला मोठा फटका खेळण्याचा प्रियांशचा प्रयत्न शार्दूल ठाकूरच्या हातात जाऊन विसावला. दिल्लीकर मित्र असलेल्या प्रियांशच्या जवळ जात दिग्वेशने विकेटचं सेलिब्रेशन केलं.

### अश्वनीचा पहिलाच सामना

प्रियांश काहीही न बोलता पॅव्हेलियनच्या दिशेने निघून गेला. काही मिनिटातच सोशल मीडियावर हे सेलिब्रेशन व्हायरल झालं.प्रतिस्पर्धी फलंदाजाला बाद केल्यानंतर त्याला उद्देशून टिप्पणी करणे तसंच त्याला ड्रेसिंगरुममध्ये जा हे खुणावणे या कलमांचा समावेश आहे. सामनाधिकारी खेळाडूंचं वर्तन पाहून योग्य तो निर्णय घेतात.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। बुधवार ।

। दि. 2 एप्रिल 2025।



KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited

Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University





## ADMISSIONS OPEN

2 Years' Full Time Postgraduate Courses

& 3/4 years' Full time Undergraduate Courses

Sharpen your leadership skills through

## MBA

Master of Business Administration

## MCA

Master of Computer Appplications

Join PIBM to become a competent professional ....

- International Certifications
- Live Industry Projects
- Startup & Business Alignments
- Research Ventures
- International Case Studies
- Industrial Visits
- Foreign Language
- Add on Skill Certifications
- Sports - Cultural Configurations
- Cross Domain Industry Specialisation
- Mentoring and Seed Funds for Startups
- International Alumni Interactions
- Association as Mentor with MCED
- Association as Mentor with IIT's
- Association as Mentor with Startup India

**AICTE Approved 3/4 Years' Full time Undergraduate Course**

## BBA

Bachelor of Business Administration

## BCA

Bachelor of Computer Applications

**Call for more details:**

**MBA/BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**MCA/BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more

# मोरया शिक्षण संस्था

## Computer Vacation Batch

**ADMISSIONS OPEN**

**2025-26**



| | | | |
|---|---|---|---|
| 'C' भाषा ₹ १३००/- | 'C++' भाषा ₹ १३००/- | बेसिक जावा ₹ १३००/- | स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/- |
| बेसिक टॅली ₹ १५००/- | एम.एस. ऑफिस ₹ १५००/- | कोरल ड्रॉ ₹ ११००/- | Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/- |

सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.

**ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100**

## सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगार निर्मिती

# "एनइपी"मुळे रोजगार निर्मिती - डॉ. शैलेंद्र देवळाणकर

### शिक्षण विश्व: पीसीसीओई मध्ये करिअर कट्टा विभागीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार( एनइपी) सुशिक्षित बेरोजगार युवकांना ग्रामपंचायत पासून बहुराष्ट्रीय कंपन्यापर्यंत योग्य तिथे इंटर्नशिप करता येईल. यामुळे नवीन रोजगार निर्मिती होईल. या इंटर्नशिप मधून शिष्यवृत्ती मिळेल. युवकांना कामाचा अनुभव मिळेल. या अनुभवामुळे करिअर निवडण्यास व आर्थिक स्वयंपूर्ण होण्यास मदत होईल.**



रोजगारांचे नवीन पर्याय निर्माण करणे ही काळाची गरज आहे. "एनइपी" मुळे शहरी भागातील औद्योगिकपट्ट्या सह ग्रामीण भागापर्यंत रोजगार निर्मिती होईल. याच्या प्रशिक्षण कलावधीमुळे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार होऊन ते गरजू आस्थापनासाठी उपलब्ध होईल. विविध आस्थापना मधील उत्पादन व सेवांमध्ये वाढ होईल आणि दूरगामी पणे राष्ट्रीय जीडीपीमध्ये देखील वाढ होईल असा विश्वास महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र व पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे, पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग निगडी येथे "करिअर कट्टा विभागीय पुरस्कार वितरण सोहळा व एक दिवसीय कार्यशाळा २०२५" आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात महाविद्यालय आणि करिअर कट्टा या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळ चे सचिन इटकर, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे आदी उपस्थित होते. डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, सध्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा आणि प्राध्यापक हे नोकरीसाठीचे केवळ दोन पर्याय दिसतात. एनइपी नुसार करिअर कट्टा अंतर्गत स्पर्धा परीक्षांसह विविध आस्थापनांमध्ये इंटर्नशिप साठी मार्गदर्शन मिळते. यावेळी करियर कट्टाचा पुणे विभागीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. यामध्ये पुणे जिल्हा, अहिल्यानगर, नाशिक येथील उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालये, प्राध्यापक, प्राचार्य, तालुका समन्वयक, महाविद्यालयीन समन्वयक, डॉक्युमेंटरी बक्षीस, विभागीय प्राचार्य प्रवर्तक, विभागीय समन्वयक, विविध समित्यांमधील विशेष कामगिरीबद्दल सन्मान, करिअर कट्टा प्रशिक्षक म्हणून निवड झालेल्या प्राचार्य, प्राध्यापक व महाविद्यालयांचा बक्षीशे देऊन सन्मान करण्यात आला.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
95277 64646 / 77967 67292
BRANCHES AT: CHARHOLI | MOSHI | DHANORE